महाराष्ट्र जनशक्ती


ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार



छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : ३२२ वे | दिनांक : २३/११/२०२६ | वार : सोमवार

सोनिया गांधींच्या पुस्तकावरून आशिष शेलारांचा शिवसेनेला टोला



मुंबई : काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या सोनिया गांधी यांच्या पुस्तकातील मजकुरावर आक्षेप घेत शिवसेनेच्या प्रवक्त्यांनी पत्रकार परिषदेत पुस्तकाची पाने फाडून निषेध नोंदवला होता. या घटनेवरून राज्याच्या राजकारणात वाद निर्माण झाला होता. आता भाजपचे नेते आणि मंत्री आशिष शेलार यांनी पुस्तक फाडण्याच्या कृतीला स्पष्ट शब्दांत विरोध दर्शवला आहे. पुस्तकातील विचारांशी सहमत किंवा असहमत असण्याचा अधिकार प्रत्येकाला आहे. मात्र, त्यासाठी पुस्तक फाडणे योग्य नाही, अशी भूमिका त्यांनी मांडली. पुण्यात एका पुस्तक प्रकाशनाच्या कार्यक्रमात बोलताना त्यांनी हे वक्तव्य केले. आशिष शेलार यांच्या या विधानामुळे राजकीय वर्तुळात नव्या चर्चेला सुरुवात झाली आहे. विशेष म्हणजे, सोनिया गांधी यांच्या पुस्तकावरून शिवसेनेने घेतलेल्या आक्रमक भूमिकेनंतर भाजपमधील एका महत्त्वाच्या नेत्याने पुस्तक फाडण्याच्या कृतीला विरोध दर्शवला आहे. त्यामुळे शेलार यांच्या वक्तव्यावर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेकडून काय प्रतिक्रिया येते, याकडेही लक्ष लागले आहे. काँग्रेसच्या माजी राष्ट्रीय अध्यक्षा सोनिया गांधी यांनी लिहिलेल्या 'बिलॉन्गिंग : अ जर्नी ऑफ लव्ह' या आत्मचरित्रातील काही मजकुरावर शिवसेनेच्या प्रवक्त्यांनी आक्षेप घेतला होता. या पुस्तकात स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्याबाबत आक्षेपार्ह मजकूर असल्याचा आरोप शिवसेनेकडून करण्यात आला. या पार्श्वभूमीवर शिवसेनेच्या सहा प्रवक्त्यांनी मुंबईत पत्रकार परिषद घेत पुस्तकातील मजकुराचा निषेध केला होता. पत्रकार परिषदेत केवळ पुस्तकातील मजकुरावर नाराजी व्यक्त करण्यात आली नाही, तर पुस्तकाची पाने फाडूनही निषेध नोंदवण्यात आला. सोनिया गांधी यांच्या लिखाणातून सावरकरांचा अपमान झाल्याचा दावा करत शिवसेनेच्या प्रवक्त्यांनी काँग्रेसवर टीका केली होती. या घटनेनंतर पुस्तकातील आशय, अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि राजकीय विरोध व्यक्त करण्याची पद्धत यावरून चर्चा सुरू झाली. या संपूर्ण प्रकरणात शिवसेनेच्या प्रवक्त्या शायना एनसी यांनी फाडलेल्या एका फोटोवरूनही मोठा राजकीय वाद निर्माण झाला होता. या फोटोमध्ये शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे आणि काँग्रेस नेते मणिशंकर अय्यर एकत्र दिसत होते. शायना एनसी यांनी हा फोटो फाडल्याचा व्हिडिओ समोर आल्यानंतर विरोधकांनी शिवसेनेवर टीका केली. बाळासाहेब ठाकरे यांचा फोटो फाडण्यात आल्याचा आरोपही करण्यात आला. या आरोपांवर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शायना एनसी यांनी मणिशंकर अय्यर यांचा फोटो फाडल्याचे सांगितले होते. शायना एनसी यांनीदेखील आपली भूमिका स्पष्ट करत असाच दावा केला. मात्र, या प्रकरणावरून राजकीय वातावरण तापल्यानंतर त्यांनी जाहीरपणे माफी मागितली होती. त्यामुळे पुस्तक फाडण्याच्या कृतीबरोबरच बाळासाहेबांच्या फोटोचा मुद्दाही चर्चेचा विषय ठरला होता.

समान नागरी कायद्याचे समर्थन; संजय शिरसाटांचा राऊतांवर निशाणा फोटो कोणाचा लावावा?

छत्रपती संभाजीनगर : संजय राऊत काहीही बोलतात, त्यांचे बोलणे कोण गांभीर्याने घेते? कधी ते निवडणूक आयोगावर आरोप करतात की त्यांनी दोन हजार कोटी रुपये घेतले, तर कधी सुप्रीम कोर्टावर आरोप करतात. देशाचे पंतप्रधान आणि गृहमंत्र्यांना त्यांच्या नजरेत काहीच किंमत नाही असे ते दाखवतात. त्यांनी आता ज्योतिष्य सांगण्याचा धंदा सुरू केला आहे. खासदारांचा रेट दीडशे कोटी रुपये झाला असे ते सांगत आहेत; कदाचित त्यांच्या खासदारांनीच हा रेट त्यांच्या कानात सांगितला असेल, असे मंत्री संजय शिरसाट यांनी म्हटले आहे. संजय शिरसाट म्हणाले की, मविआच्या काळात पोलिसांना काम करता येत नव्हते; पण देवेंद्र फडणवीस हे पोलिसांना सक्षम करण्याचे काम करत आहेत. समान नागरी कायदा लागू केलाच पाहिजे, त्यामध्ये गैर काय आहे? आमचे राज्य समान नागरी कायद्याच्या धोरणाला पाठिंबा देत आहे. समान नागरी कायदा देशात लागू झाल्यास आम्हाला आनंदच होईल. राऊतांच्या बोलण्याचा लोकांना कंटाळा आला आहे. डिलिमिटेशन होणार हे राऊतांना माहिती आहे, म्हणून ते दीडशे कोटी रुपयांचे आकडे सांगत आहेत. संजय शिरसाट म्हणाले की, टिपू सुलतानबद्दल आता प्रेम का उफाळून येत आहे, हे मला समजत नाही. ओवेसींनी त्यांच्याबद्दल प्रेम दाखवणे साहजिक आहे, कारण त्यांना मुस्लीम मतदान घ्यायचे आहे; पण धाराशिवमध्ये भाजपचे नगरसेवक त्यामध्ये सामील झाले, त्यामुळे त्यांचा पक्ष निश्चितच त्यांच्यावर कारवाई करेल. कारण त्यांच्या पक्षाची भूमिका टिपू सुलतानचे गोडवे गाण्याची नाही. त्या नगरसेवकांवर काय कारवाई होते, हे पाहणे महत्त्वाचे राहील. टिपू सुलतानबद्दल सरकारने जी भूमिका आधी जाहीर केली, तीच भूमिका आजही कायम आहे.

दुष्काळाच्या संकटावर मात करण्यासाठी सरकारचा मोठा निर्णय



मुंबई : राज्यात एल निनोच्या संभाव्य प्रभावामुळे आगामी काळात पाणीटंचाई आणि दुष्काळी परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेऊन राज्य सरकारने आतापासूनच उपाययोजनांना वेग देण्याचा निर्णय घेतला आहे. राज्यातील जास्तीत जास्त गावांमध्ये मृद व जलसंधारणाची कामे पूर्ण करण्यासाठी विशेष नियोजन करण्यात येत आहे. आगामी पावसाळ्यापूर्वी म्हणजेच ३० जून २०२७ पर्यंत ही कामे पूर्ण करण्याचे शासनाचे उद्दिष्ट आहे. यासाठी मृद व जलसंधारण विभागासोबतच कृषी विभागाची यंत्रणाही सक्रिय केली जाणार आहे. दोन्ही विभागांच्या समन्वयातून जलसंधारणाच्या कामांचा विस्तार आणि वेग वाढविण्याचा निर्णय दुष्काळावरील मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीत घेण्यात आला आहे, अशी माहिती मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी दिली. राज्यात यंदा एल निनोच्या संभाव्य प्रभावामुळे पावसाचे प्रमाण आणि पाण्याच्या उपलब्धतेबाबत चिंता व्यक्त केली जात आहे. अशा परिस्थितीत पाणीटंचाईचा सामना करण्यासाठी केवळ पावसावर अवलंबून न राहता उपलब्ध पाण्याचे योग्य नियोजन करणे आणि पावसाचे पाणी जमिनीत जिरविण्यासाठी आवश्यक उपाययोजना करणे महत्त्वाचे ठरणार आहे. याच पार्श्वभूमीवर राज्य सरकारने जलसंधारणाच्या कामांना प्राधान्य देण्याचे ठरविले आहे. गावपातळीवर ही कामे मोठ्या प्रमाणावर पूर्ण करण्यासाठी विविध विभागांच्या यंत्रणांचा एकत्रित वापर केला जाणार आहे. स्वतंत्र मृद व जलसंधारण विभागाची स्थापना झाल्यानंतर राज्यात जलसंधारणाच्या विविध कामांना गती देण्यात आली आहे. कोल्हापूर पद्धतीचे बंधारे, साठवण तलाव, सिमेंट नाला बांध, पाझर तलाव तसेच गाळमुक्त धरण-गाळयुक्त शिवार यांसारख्या योजनांच्या माध्यमातून पाणी साठवण आणि भूजल पातळी वाढविण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. या कामांमध्ये प्रशासकीय आणि तांत्रिक पातळीवर विभागाने प्रभावी कामगिरी केली आहे. मात्र, आगामी पावसाळ्यापूर्वी राज्यभरात मोठ्या प्रमाणावर जलसंधारणाची कामे पूर्ण करायची असल्याने उपलब्ध मनुष्यबळ आणि यंत्रणेचा अधिक प्रभावी वापर करण्याची गरज आहे. मृद व जलसंधारण विभागाची स्वतःची यंत्रणा सक्षम असली तरी ग्रामीण भागात थेट शेतकऱ्यांशी संपर्कात असलेल्या कृषी विभागाच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे सहकार्य मिळाल्यास कामांचा विस्तार करणे अधिक सोपे होणार आहे. त्यामुळे कृषी विभाग आणि मृद व जलसंधारण विभाग यांच्यात समन्वय वाढवून संयुक्तपणे कामे करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. दोन्ही विभागांच्या समन्वयातून कामे करण्याच्या निर्णयावर स्पष्टीकरण देताना मंत्री संजय राठोड यांनी सांगितले की, हा निर्णय कोणत्याही विभागाच्या कार्यक्षमतेवर अविश्वास व्यक्त करणारा नाही. मर्यादित कालावधीत राज्यभरात मोठ्या प्रमाणावर जलसंधारणाची कामे पूर्ण करायची असल्याने सामूहिक जबाबदारीतून उद्दिष्ट साध्य करण्याचा हा प्रयत्न आहे. कृषी विभागाची यंत्रणा ग्रामीण भागात शेतकऱ्यांशी जोडलेली असल्याने तिचा उपयोग जलसंधारणाच्या कामांसाठी होऊ शकतो. मृद व जलसंधारण आणि कृषी हे दोन्ही विभाग शेतकऱ्यांच्या हितासाठी एकमेकांना पूरक आहेत. त्यामुळे या निर्णयात श्रेयवादाचा कोणताही प्रश्न नसून संभाव्य दुष्काळी परिस्थितीचा सामना करण्यासाठी सर्व शासकीय यंत्रणांनी एकत्रितपणे काम करणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांचे हित सर्वोच्च प्राधान्याने लक्षात घेऊनच हा निर्णय घेण्यात आल्याचे राठोड यांनी स्पष्ट केले. जलसंधारणाच्या कामांमध्ये गुणवत्ता, पारदर्शकता आणि कामांचा अचूक आढावा घेण्यासाठी राज्य सरकार आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणार आहे.

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार २३ नोव्हेंबर २०२६

सुरेशदाजी बिराजदार व सुनिता पावशेरे यांच्या पाठपुराव्याला यश



उमरगा (प्रा. नागसेन कांबळे) : तालुक्यातील कलदेव लिंबाळा येथे आता सोळा गावाच्या पाणीपुरवठा योजनेची यशस्वी चाचणी झाली असून दुष्काळात प्रत्येकाच्या घराघरांत पाणी पोहोचणार आहे.अनेक वर्षांपासून प्रतीक्षेत असलेल्या कलदेव निंबाळा गावासह सोळा गावांच्या प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेच्या दृष्टीने अखेर महत्त्वाचा टप्पा पूर्ण झाला आहे. माकणी धरणातून (दि. 21 नोव्हेंबर) योजनेचे पाणी जलशुद्धीकरण केंद्रापर्यंत पोहोचले असून, आमदार प्रवीन स्वामी, जि प उपाध्यक्ष उषाताई गायकवाड, लोहारा तसं सभापती सौ. पल्लवी जानकर, राष्ट्रवादी महिला जिल्हा उपाध्यक्ष सुनिता पावशेरे, माकणी सरपंच विठ्ठल साठे, सामाजिक कार्यकर्ते देविदास पावशेरे,महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे अधिकारी व संबंधित कंत्राटदार यांच्या उपस्थितीत पाणीपुरवठ्याची चाचणी यशस्वीपणे पार पडली. जलशुद्धीकरण केंद्रात पाणी शुद्धीकरणाची प्रक्रियाही सुरू झाली आहे. त्यामुळे येत्या काही दिवसांत कलदेव निंबाळ्यासह सोळा गावांतील नागरिकांची पाण्याची प्रतीक्षा संपणार आहे.या योजनेला गती मिळवून देण्यासाठी ग्रामपंचायत स्तरापासून ते मंत्रालयापर्यंत सातत्याने पाठपुरावा करणाऱ्या ग्रामपंचायत गटनेत्या तथा तत्कालीन सरपंच सौ. सुनीता देविदास पावशेरे आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष प्रा. सुरेश बिराजदार यांनी विशेष प्रयत्न केले. योजनेच्या विलंबाविरोधात सुनीता पावशेरे यांनी आमरण उपोषणाचा मार्गही अवलंबला होता. विविध प्रशासकीय स्तरांवर निवेदने, बैठका आणि सातत्यपूर्ण पाठपुरावा करून योजनेच्या कामाला गती देण्यासाठी त्यांनी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. प्रा. सुरेश बिराजदार यांनीही सुरुवातीपासून या प्रश्नात लक्ष घालून संबंधित स्तरावर पाठपुरावा व सहकार्य केले. या दोघांच्या एकत्रित प्रयत्नांमुळे योजनेच्या प्रत्यक्ष कार्यान्वित होण्याचा मार्ग सुकर झाला.पाणी जलशुद्धीकरण केंद्रात पोहोचल्यानंतर सुनीता पावशेरे यांनी प्रत्यक्ष चाचणीस्थळी उपस्थित राहून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे कार्यकारी अभियंता हेमंत नागदे, उपअभियंता हेमंत विधाते, विज्योती कन्स्ट्रक्शनचे चेतन पाटील तसेच संजय मोरे, अविनाश जाधव, शंकर राठोड व संबंधित अधिकारी-कर्मचाऱ्यांचे पेढे वाटून अभिनंदन केले व आभार मानले.अनेक वर्षांपासून रखडलेली ही योजना विविध कारणांमुळे विलंबात अडकली होती. मात्र, यंदाच्या दुष्काळी परिस्थितीत गावागावांतील पाणीटंचाई अधिक गंभीर बनल्याने या योजनेच्या पाठपुराव्याला अधिक वेग आला. अखेर पाणी जलशुद्धीकरण केंद्रापर्यंत पोहोचल्याने सोळा गावांतील नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. पुढील काही दिवसांत शुद्ध पाणी गावांच्या नळांपर्यंत पोहोचण्याची अपेक्षा आहे.या योजनेसाठी सुरुवातीपासून सहकार्य करणारे प्रा. सुरेश बिराजदार, ईतरही सर्व संबंधित लोकप्रतिनिधी, सर्व अधिकारी, कर्मचारी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण आणि कंत्राटदार यांच्यासह सर्व सहकार्य करणाऱ्यांचे सुनीता पावशेरे यांनी आभार व्यक्त केले.

मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर

साहिल कॉम्प्युटर्स ॲण्ड मल्टी सर्व्हिसेस

डी.टी.पी. जॉब वर्क

एम.फिल-पी.एच.डी. थेसिस

मराठी, हिंदी, इंग्रजी

कलर प्रिंट स्कॅनिंग

झेरॉक्स

स्पायरल बायंडिग

लॅमिनेशन

थेसिस बायंडिग

विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद

8956362639, 8087880274, 9405109103

उंबरमाळी रेल्वे स्थानकावर अडकलेल्या प्रवाशांच्या मदतीला धावली 'लालपरी'

मुंबई/बीड (भगवंत पाळवदे) : काल रात्री मध्य रेल्वेच्या कसारा मार्गावरील वाहतूक रात्री नऊ वाजल्यापासून विस्कळीत झाल्याने उंबरमाळी रेल्वे स्थानकावर अनेक प्रवासी अडकून पडले होते. रात्रीची वेळ आणि प्रवासासाठी अन्य पर्याय उपलब्ध नसल्याने विशेषत: महिला व महाविद्यालयीन तरुणी चिंतेत होत्या. अशा परिस्थितीत कसारा येथे थांबलेली एसटी बस प्रवाशांच्या मदतीसाठी तातडीने उंबरमाळी येथे पोहोचली. एसटी चालक आणि वाहकाने दाखविलेल्या या समयसूचकतेमुळे अनेक प्रवाशांना सुरक्षित प्रवासाचा आधार मिळाला. या कर्तव्यदक्षतेचे परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी विशेष कौतुक केले.रेल्वे वाहतूक ठप्प झाल्याने उंबरमाळी स्थानकावर चाकरमानी, विद्यार्थी, महिला आणि अन्य प्रवासी अडकले होते. ही बाब लक्षात येताच कसारा येथे थांबलेल्या एसटी बसचे चालक किरण खांडवी आणि वाहक राकेश पत्की यांनी परिस्थितीचे गांभीर्य ओळखून आगारात बसस्थानक प्रमुख यांना माहिती दिली. तसेच अडकलेल्या प्रवाशांच्या मदतीसाठी बस पाठविण्याची विनंती केली. बसस्थानक प्रमुख श्रीमती पूनम देशमुख यांनीही यास दुजोरा दिल्यानंतर लालपरी तातडीने उंबरमाळी स्थानकाकडे रवाना करण्यात आली.रात्रीच्या वेळी एसटी बस उपलब्ध झाल्याने प्रवाशांनी सुटकेचा निश्वास सोडला. बसमध्ये महाविद्यालयीन तरुणी आणि नोकरदार महिलांची संख्या लक्षणीय होती. सुरक्षित प्रवासाची सोय झाल्याचे समजताच त्यांनी आपल्या पालकांना दूरध्वनी करून एसटी बस मदतीला आल्याची माहिती दिली. त्यामुळे कुटुंबीयांचीही चिंता दूर झाली. प्रवाशांनी चालक आणि वाहकाचे आभार मानले. त्यानंतर ही बस सर्व प्रवाशांना घेऊन नाशिकच्या दिशेने रवाना झाली.या घटनेची दखल घेत परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी चालक किरण खांडवी, वाहक राकेश पत्की आणि संबंधित एसटी प्रशासनाचे अभिनंदन केले. 'एसटी महामंडळ ही केवळ प्रवासी वाहतुकीची सेवा नसून, अडचणीच्या प्रसंगी सामान्य माणसाच्या मदतीला धावून जाणारी विश्वासाची यंत्रणा आहे. प्रवाशांच्या अडचणीचे गांभीर्य ओळखून तत्परतेने मदतीचा हात देणाऱ्या कर्मचाऱ्यांमुळे महामंडळाची सेवाभावी परंपरा अधिक दृढ होत आहे,' असे त्यांनी नमूद केले.प्रवाशांची सुरक्षितता आणि सुविधा यांना सर्वोच्च प्राधान्य देत संकटसमयी मदतीसाठी पुढाकार घेणे, हीच एसटीची खरी ओळख आहे. किरण खांडवी आणि राकेश पत्की यांनी आपल्या कृतीतून कर्तव्यनिष्ठेचा आदर्श घालून दिला आहे, अशा शब्दांत मंत्री सरनाईक यांनी संबंधित कर्मचाऱ्यांच्या कार्याचे कौतुक केले

रॅपिडोविरोधात मनसे व रिक्षा संघटना आक्रमक; उद्या महाराष्ट्र बंदची हाक



मुंबई : महाराष्ट्रात उद्या (२३ नोव्हेंबर) रिक्षा बंद आंदोलनाची हाक देण्यात आली आहे. रॅपिडोच्या माध्यमातून सुरू असलेल्या दुचाकीवरील प्रवासी वाहतुकीला विरोध करण्यासाठी राज्यातील रिक्षा संघटना एकवटल्या आहेत. महाराष्ट्र नवनिर्माण सेना आणि सर्वपक्षीय रिक्षा वाहतूक संघटनांनी या आंदोलनाला पाठिंबा दिला आहे. त्यामुळे उद्या राज्यातील विविध शहरांमध्ये रिक्षा सेवा विस्कळीत होण्याची शक्यता आहे. या आंदोलनाचा परिणाम मुंबई, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर आणि नागपूरसह अन्य शहरांमध्ये जाणवू शकतो. रॅपिडोच्या माध्यमातून सुरू असलेल्या दुचाकी प्रवासी वाहतुकीवरून गेल्या काही दिवसांपासून वाद निर्माण झाला आहे. या वाहतुकीसाठी आवश्यक असलेल्या परवानग्या, वाहनांची नोंदणी, चालकांकडे असणारा बॅच आणि प्रवाशांच्या सुरक्षेचा मुद्दा उपस्थित करण्यात येत आहे. याच मुद्द्यांवरून महाराष्ट्र नवनिर्माण वाहतूक सेनेने सरकार आणि परिवहन विभागाच्या भूमिकेवर प्रश्न उपस्थित केले आहेत. यासंदर्भात मनसेसह विविध रिक्षा संघटनांची पत्रकार परिषद पार पडली. या पत्रकार परिषदेत आंदोलनाची भूमिका स्पष्ट करण्यात आली. पत्रकार परिषदेत महाराष्ट्र नवनिर्माण वाहतूक सेनेचे अध्यक्ष संजय नाईक यांनी रॅपिडोच्या प्रवासी वाहतुकीवर आक्षेप घेतला. त्यांच्या म्हणण्यानुसार, देशातील विविध भागांमध्ये दुचाकींच्या माध्यमातून प्रवासी वाहतूक सुरू आहे. महाराष्ट्रातही अशा प्रकारच्या वाहतुकीला परवानगी नसताना ती सुरू असल्याचा आरोप त्यांनी केला. मुंबई, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर आणि नागपूर या शहरांमध्ये रॅपिडोच्या माध्यमातून दुचाकीवरून प्रवासी वाहतूक केली जात असल्याचे नाईक यांनी सांगितले. या प्रकाराला विरोध करण्यासाठी यापूर्वीही विविध रिक्षा संघटनांनी परिवहन आयुक्तांकडे पत्रव्यवहार केला होता. मात्र, त्यावर अद्याप ठोस उत्तर मिळाले नसल्याचा दावा त्यांनी केला. ऑटो रिक्षा पंचायत समितीचे अध्यक्ष बाबा कांबळे यांनी २३ नोव्हेंबर रोजी संपूर्ण महाराष्ट्रात रिक्षा बंद आंदोलन पुकारले आहे. या आंदोलनाला महाराष्ट्र नवनिर्माण वाहतूक सेनेसह विविध रिक्षा संघटनांनी पाठिंबा दिला आहे. आंदोलनाच्या दिवशी जिल्हाधिकारी आणि परिवहन आयुक्तांना निवेदन देण्याचे नियोजन करण्यात आले आहे. रॅपिडोच्या माध्यमातून सुरू असलेल्या दुचाकी प्रवासी वाहतुकीवर कारवाई करावी आणि हा प्रकार बंद करण्यात यावा, अशी आंदोलकांची प्रमुख मागणी आहे. सरकारकडून आणि परिवहन विभागाकडून या प्रश्नावर स्पष्ट भूमिका मांडली जात नसल्याने आंदोलनाचा मार्ग स्वीकारल्याचे संजय नाईक यांनी सांगितले. या पत्रकार परिषदेत संजय नाईक यांनी प्रवासी वाहतुकीसाठी आवश्यक असलेल्या नियमांचाही मुद्दा उपस्थित केला. त्यांच्या म्हणण्यानुसार, कायद्यानुसार प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनचालकाकडे आवश्यक बॅच असणे गरजेचे आहे. मात्र, रॅपिडोच्या माध्यमातून दुचाकीवरून प्रवासी वाहतूक करणाऱ्या चालकांकडे हा बॅच नसल्याचा आरोप त्यांनी केला.

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार २३ नोव्हेंबर २०२६

दुष्काळाचा बळी फायनान्स कर्मचारी काढू शासनाच्या दारी दुष्काळी वारी

मायबाप जनतेनं समजून घेणं गरजेचं आहे
सध्या जी कर्जदारांची स्थिती आहे
तीच वसुलीवाल्यांची गत झाली आहे
फायनान्स नोकरदारांना त्रास देऊन
कर्ज थोडी माफ होणार आहे...?

वसुलीवाल्यांना वरीष्ठांकडून प्रेशर चालू आहे
बिचारे मजबुरीनं फायनान्समध्ये नोकरी करत आहे
कंपनीचं प्रेशर, त्यात पुन्हा जनतेचं अन् शासनाचं प्रेशर
दोघांच्या प्रेशरमध्ये वसुलीवाल्यांचा जीव जातो आहे
दुष्काळात या फायनान्स कर्मचाऱ्यांचा बळी जातो आहे...

नोकरांच्या हातात काही नाही
मालकांच्या हातात सारं आहे
जनतेचं मालक सरकार आहे
सरळ-सरळ जी.आर. काढून
तोंडी नाही, लेखी द्यावं लिहून

आरबीआयला मध्यस्थी करुन
फायनान्स मालकांशी चर्चा करावी, बोलून-बसून
कर्जदारांना त्रास होणार नाही अन्
कर्मचाऱ्यांच्या नोकऱ्या जाणार नाही
दोन्ही बाजूंनी तोडगा काढा म्हणावं

सगळ्या फायनान्स कंपन्यांना
वैयक्तिक आदेश देऊन टाका
सरसकट कर्जमाफीचा आदेश देऊन टाका
नाहीतर थोड्यात-थोडकं
बिनव्याजी मोरॅटोरियमचा गुलाल उधळून टाका

दुष्काळाचा बळी फायनान्स कर्मचारी
काढा शासनाच्या दारी दुष्काळी वारी
कर्मचाऱ्यांवर आणू नका लटकण्याची बारी
मायबाप जनतेनं फायनान्स कर्मचाऱ्यांना समजून घ्यावं
त्यांना मारून-ठोकून, धमकावून, अपमानित करुन
आपण आपल्याच पायावर धोंडा टाकून घेतो आहे
आपल्या-आपल्यात भांडून कर्ज थोडी माफ होणार आहे ?

लक्ष्मण वाल्डे
८८८८६ ०६०६८

'ऐका जरा': मायबाप हाच खरा देव सांगणारी कविता

कवी : नागेश बोंतेवाड - संत परंपरेने सांगितलेलं सर्वात मोठं सत्य या छोट्या सात चरणांच्या अभंगात आहे दगडात देव शोधू नका, देव घरात आहे. नागेश बोंतेवाड यांचा हा अभंग उपदेश नाही, ही आर्त हाक आहे. 'ऐका जरा' हे शीर्षकच सांगतं की कवीला ओरडून सांगावं लागतंय, कारण माणूस ऐकत नाहीये. देऊळ गाठतो, पण घर विसरतो.१) दगडातला देव आणि घरातला देव पहिल्याच चरणात कवी प्रहार करतो. दगडात देव नाही मिळणार, कधी कळणार मानवाला. हा प्रश्न प्रत्येकाला विचारलेला आहे. आपण दगडाला शेंदूर लावतो, दुधाने आंघोळ घालतो, पण घरातल्या जिवंत देवाला पाणीही विचारत नाही. हा विरोधाभास कवीने एका ओळीत पकडला आहे- 'दगडात देव नाही मिळणार, कधी कळणार मानवाला' ही ओळ संत तुकारामांच्या 'देव तळी धरी, मळी परिसे' या विचाराची आठवण करून देते. दगड निर्जीव आहे, पण मायबाप सजीव आहेत. निर्जीवात जीव शोधण्यापेक्षा सजीवात देव शोधा, हा सरळ आणि स्पष्ट संदेश आहे. 'कधी कळणार' या प्रश्नात कवीची तळमळ आहे, चीड नाही.२) सेवेतला आनंद दुसऱ्या चरणात कवी उपाय सांगतो. माय बाप सेवा सतत करावे, आनंद भरावे जीवनात. सेवा केली की आनंद मिळतो, हा हिशेब साधा आहे. सेवा म्हणजे फक्त पाय दाबणे नाही, तर त्यांना वेळ देणे, त्यांचं ऐकणे. तो आनंद विकत मिळत नाही, तो सेवेतून येतो- 'माय बाप सेवा सतत करावे, आनंद भरावे जीवनात' ज्ञसतत हा शब्द महत्त्वाचा आहे. एकदा सेवा करून फोटो काढणे म्हणजे सेवा नाही. ती रोजची, सततची असावी लागते. आनंद भरावे म्हणजे आनंद आपोआप येतो, आणावा लागत नाही. जो आईवडिलांना सुखी ठेवतो, त्याच्या जीवनात आनंद भरल्याशिवाय राहत नाही, हा अनुभवाचा बोल आहे.३) रूपकाची उकल तिसऱ्या चरणात कवी स्वतःचं सांगणं स्पष्ट करतो.देवाच्या रूपात मायबाप तुझे, सांगणे हे माझे ऐका जरा. इथे तो थेट बोलतो. हे माझं सांगणं आहे, ऐका जरा. देव दिसत नाही, पण मायबाप दिसतात. जे दिसत नाही त्याच्या मागे धावण्यापेक्षा जे दिसतंय त्याची सेवा करा- 'देवाच्या रूपात मायबाप तुझे, सांगणे हे माझे ऐका जरा' रूपात हा शब्द इथे प्रतीक आहे. मायबाप हेच देवाचे रूप आहेत, दुसरं रूप शोधायची गरज नाही. 'ऐका जरा' ही विनवणी आहे, हुकूम नाही. मोठ्या माणसाने लहानाला समजवावं तसं कवी समजावतोय. यात अहंकार नाही, कळकळ आहे.४) तन मन धनाचा त्याग चौथं चरण थोडं कठीण वाटतं, पण सत्य आहे. तन मन धन अर्पण करावे, सुखात ठेवावे माय बाप. आपण देवाला तन मन धन अर्पण करतो, नवस बोलतो, पण आईवडिलांसाठी वेळ काढत नाही. कवी म्हणतो, तेच अर्पण आधी घरात करा- 'तन मन धन अर्पण करावे, सुखात ठेवावे माय बाप' तन म्हणजे शरीराने सेवा, मन म्हणजे मनाने आदर, धन म्हणजे कमावलेलं त्यांच्यासाठी खर्च करणं. हे तिन्ही एकत्र आले की सेवा पूर्ण होते. सुखात ठेवावे म्हणजे त्यांना मोठा बंगला नको, तर तुमचं सुख पाहिजे. तुम्ही जवळ असणं हेच त्यांचं सुख आहे.५) कामातून समाधान पाचव्या चरणात कवी कर्माचा सिद्धांत सांगतो. काम करा असे लाभो समाधान, वाटे अभिमान सर्वकाळ. आईवडिलांची सेवा करणाऱ्याच्या हातून वाईट काम होत नाही. त्याच्या कामात समाधान असतं, आणि त्याचा अभिमान घराला आणि समाजालाही वाटतो- 'काम करा असे लाभो समाधान, वाटे अभिमान सर्वकाळ' समाधान आणि अभिमान हे दोन शब्द इथे जोडले आहेत. समाधान स्वतःला मिळतं, अभिमान दुसऱ्याला वाटतो. जो आईवडिलांची सेवा करतो, त्याच्या कामाला एक वेगळीच चमक येते. तो काम चुकवत नाही, टाळत नाही. त्याच्या कामात एक प्रामाणिकपणा येतो.६) सेवेचं फळ सहाव्या चरणात कवी फळ सांगतो - माय बाप सेवा सदा सुख देई, मदतीस येई कर्म तुझे. सेवा केली की सुख मिळतंच, पण त्याहून महत्त्वाचं म्हणजे तुमचं कर्म तुमच्या मदतीला येतं. म्हणजेच तुम्ही केलेली सेवा कधीच वाया जात नाही, ती संकटात तुमच्या पुढे उभी राहते- 'माय बाप सेवा सदा सुख देई, मदतीस येई कर्म तुझे' सदा सुख देई म्हणजे एकदा नाही, तर कायमचं सुख. आणि कर्म मदतीस येणं म्हणजे निसर्गाचा नियम. तुम्ही जे पेरता तेच उगवतं. आईवडिलांना सुख दिलं की तेच सुख दुप्पट होऊन तुमच्याकडे येतं. हा आशिर्वादाचा प्रसाद आहे.७) अभंगातलं सत्य शेवटच्या चरणात कवी स्वतःच्या नावासह शिक्का मारतो. नागेश बोंतेवाड सांगतात अभंगात सत्य, कर सेवा नित्य मनोभावे. मी सांगतोय ते खोटं नाही, सत्य आहे. आणि ते नित्य करा, मनोभावे करा. दिखाव्यासाठी नाही, मनापासून करा- 'नागेश सांगतो अभंगात सत्य, कर सेवा नित्य मनोभावे' मनोभावे हा शब्द या अभंगाचा आत्मा आहे. सेवा शरीराने होते, पण ती मनाने झाली तरच ती पोहोचते. नित्य हा शब्द सातत्य सांगतो. आज केली उद्या नाही, असं नाही. रोज, मनापासून. हेच संतांनी सांगितलं आणि हेच नागेश बोंतेवाड यांनी आपल्या साध्या सोप्या भाषेत पुन्हा एकदा 'ऐका जरा' म्हणून सांगितलं आहे.

प्राचार्य डॉ. वसंत बिरादार,
महात्मा फुले महाविद्यालय
अहमदपूर जि. लातूर





महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार २३ नोव्हेंबर २०२६

माणुसकी

पुस्तकाच्या गराड्यात,
अन् गोतावळ्यात.
कष्ट उपसून ,
मग्न व्हावे.
लिन व्हावे.
स्पर्धेत विद्यार्थ्याने!

आपण चांगले हिरे,
मातीत मिसळवीलेत
सद् गुणाचे परिमाण
न मोजता..
गावात.
भाकर अन्
तांब्याभर
कोड्याशासाठी .

आता,
वर तोंड काढून .
म्हणता,!
त्यांनीच सवलती
लाटल्या,
फितूर झाले.
अबकडच हाडूक
चघळीत.

उपाशी पोटाना
गद्दारीचा डोस पाजणाऱ्या.
गद्दार गिधाडानो .
माणूस व्हा.
मानवमुक्तीचे गाणे
गाण्यासाठी.

मायला पदर घे.
बुरखा घे सांगून,
नंगानाच करणाऱ्या
वृत्तीच्या विरोधात
आम्ही,
निशाण हाती घेत
जन्मास घालतो.
माणुसकीच.
फक्त..
माणुसकी....

मधुबानंदा प्रधान ,
अकोला.

प्रवेश सुरू

डी.एम.एल.टी.

P.G.DMLT

फिजोओथेरिपी

डिप्लोमा ऑप्थोमेट्री

OT टेक्नीशियन

X-Ray, ECG

रेडीओलॉजी

संपर्क

9405109103

मतदार यादीतून नाव वगळलेल्या बीडमधील २.४० लाख मतदारांना शेवटची संधी; ३० नोव्हेंबरपर्यंत गणना प्रपत्र भरण्याचे आवाहन

बीड (भगवंत पाळवदे) : भारत निवडणूक आयोगाच्या विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम २०२६ अंतर्गत ३१ ऑगस्ट २०२६ रोजी प्रसिद्ध झालेल्या प्रारुप मतदार यादीत अनुपस्थित, स्थलांतरीत, मृत किंवा दुबार (ASDD) प्रवर्गामुळे ज्या मतदारांची नावे समाविष्ट होऊ शकली नाहीत, अशा मतदारांना नाव नोंदणीसाठी आणखी एक संधी देण्यात आली आहे. बीड जिल्ह्यात अशा मतदारांची संख्या २ लाख ४० हजार ४७७ असून, त्यांना १८ ते ३० नोव्हेंबर २०२६ या कालावधीत आपले गणना प्रपत्र भरून देता येणार आहे. प्राप्त झालेल्या या प्रपत्रांवर १० डिसेंबर २०२६ पर्यंत कार्यवाही करून ती निकाली काढली जातील.जिल्हा निवडणूक कार्यालयाने दिलेल्या आकडेवारीनुसार, बीड जिल्ह्यातील एएसडीडी प्रवर्गात सर्वाधिक १ लाख ३ हजार ३३४ कायमस्वरुपी स्थलांतरीत मतदार आहेत. याशिवाय ५६ हजार ८८६ गैरहजर, ५० हजार ९१३ मयत, २८ हजार ५१६ यापूर्वीच नोंदणी झालेले आणि ८२८ इतर मतदारांचा या यादीत समावेश आहे. या सर्व मतदारांची यादी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या https://beed.gov.in/निवडणूक-विभाग/ या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे.संबंधित मतदार नोंदणी अधिकारी, सहायक मतदार नोंदणी अधिकारी आणि मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांमार्फत (बीएलओ) ही पूर्वमुद्रित गणना प्रपत्रे मतदारांपर्यंत प्रत्यक्ष किंवा व्हॉट्सॲप, ई-मेल आणि एसएमएसद्वारे पोहोचवण्याचा प्रयत्न सुरू आहे. बीएलओ राजकीय पक्षांच्या मतदान केंद्रस्तरीय प्रतिनिधींशी समन्वय साधून तसेच शेजारी, नातेवाईक किंवा रहिवासी कल्याणकारी संस्थांच्या मदतीने मतदारांशी संपर्क साधून प्रक्रियेची माहिती देणार आहेत. याव्यतिरिक्त मतदार स्वतः बीएलओशी संपर्क साधून किंवा voters.ecinet.gov.in या संकेतस्थळावर आपला ईपीआयसी (EPIC) क्रमांक प्रविष्ट करून हे प्रपत्र ऑनलाइन डाऊनलोड करून भरू शकतात.जे मतदार मूळ निवासस्थानापासून स्थलांतरीत झालेले नाहीत, त्यांना गणना प्रपत्रासोबत जोडपत्र-ब मध्ये यापूर्वी प्रपत्र का सादर करता आले नाही याची माहिती नमूद करणे आवश्यक आहे. तर मूळ पत्त्यावरून स्थलांतरीत झालेल्या मतदारांना जोडपत्र-क मध्ये नवीन पत्ता आणि विधानसभा मतदारसंघाचा तपशील भरून सध्याच्या निवासस्थानाशी संबंधित मतदार नोंदणी किंवा सहायक मतदार नोंदणी अधिकाऱ्यांकडे अर्ज सादर करता येईल. ज्या मतदारांनी प्रारुप मतदार यादी प्रसिद्ध झाल्यानंतर नाव समाविष्ट करण्यासाठी यापूर्वीच फॉर्म-६ भरला आहे, त्यांना पुन्हा गणना प्रपत्र भरण्याची आवश्यकता नाही.एएसडीडी यादीत नाव असलेल्या आणि अद्याप फॉर्म-६ न भरलेल्या सर्व पात्र मतदारांनी ऑनलाइन किंवा ऑफलाइन पद्धतीने गणना प्रपत्र व संबंधित घोषणापत्र भरून अंतिम मतदार यादीत आपले नाव निश्चित करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी विवेक जॉन्सन यांनी केले आहे.

मुख्यमंत्रीपदाच्या चर्चेवर तुकाराम मुंढेंचे स्पष्ट उत्तर; म्हणाले, 'वास्तवात जगतो'



पुणे : प्रशासकीय कामकाजातील शिस्त, स्पष्टवक्तेपणा आणि धडाकेबाज कारवाईसाठी ओळखले जाणारे अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे पुन्हा एकदा चर्चेत आले आहेत. पुण्यातील एफसी कॉलेजच्या मैदानावर आयोजित यूथ फेस्टिव्हलमध्ये त्यांनी युवक-युवतींशी संवाद साधला. यावेळी त्यांच्या व्याख्यानाला तरुणांचा मोठा प्रतिसाद मिळाला. कार्यक्रमानंतर पत्रकारांशी संवाद साधताना त्यांना थेट मुख्यमंत्री होण्याची इच्छा आहे का, असा प्रश्न विचारण्यात आला. त्यावर मुंढे यांनी मिश्किल पण स्पष्ट शब्दांत उत्तर दिले. मुख्यमंत्री होण्याची इच्छा ही केवळ 'विश लिस्ट'चा भाग आहे. मात्र, मी विश लिस्टमध्ये राहत नाही, तर वास्तवात जगतो, असे त्यांनी सांगितले. पुण्यातील एफसी कॉलेजमध्ये सुरू असलेल्या यूथ फेस्टिव्हलमध्ये तुकाराम मुंढे यांचे विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. प्रशासकीय सेवेत काम करताना आलेले अनुभव, जबाबदारीची जाणीव आणि सार्वजनिक जीवनातील भूमिका याविषयी त्यांनी उपस्थित तरुणांना मार्गदर्शन केले. त्यांच्या विचारांतून युवकांना प्रेरणा आणि दिशा मिळावी, या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. व्याख्यानानंतर पत्रकारांनी त्यांच्याशी विविध विषयांवर संवाद साधला. यावेळी मुख्यमंत्री होण्याच्या इच्छेबाबत विचारण्यात आलेल्या प्रश्नाने सर्वांचे लक्ष वेधले. या प्रश्नाला उत्तर देताना मुंढे म्हणाले की, मुख्यमंत्री होण्याची इच्छा ही केवळ विश लिस्टचा भाग असू शकते. मात्र, मी विश लिस्टमध्ये राहत नाही, तर वास्तवात जगतो. मी एक लोकसेवक आहे. केवळ नोकरीपुरते स्वतःला मर्यादित न ठेवता आपली भूमिका काय आहे, आपली जबाबदारी काय आहे, हे समजून घेऊन ती जगण्याचा प्रयत्न करतो. प्रत्येक व्यक्तीचा स्वाभिमान आणि प्रतिष्ठा जपणे, हीच माझ्या जीवनाची व्याख्या आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले. दरम्यान, अन्न व औषध प्रशासनाच्या आयुक्तपदाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर तुकाराम मुंढे यांनी राज्यभरातील कामकाजाला गती देण्यावर भर दिला आहे. विशेषतः अन्न आणि औषधांच्या नमुन्यांची तपासणी करून त्यांचे अहवाल मिळण्यास लागणारा वेळ कमी करण्यासाठी प्रशासनाकडून प्रयत्न सुरू आहेत. याबाबत माहिती देताना त्यांनी सांगितले की, पूर्वी नमुन्यांचे तपासणी अहवाल मिळण्यासाठी ३० दिवसांपासून ते सहा महिन्यांपर्यंतचा कालावधी लागत होता. त्यामुळे संबंधित प्रकरणांवरील पुढील कारवाईलाही विलंब होत होता. मात्र, गेल्या सहा महिन्यांत या प्रक्रियेत सुधारणा करण्यात आली असून अहवाल मिळण्याचा कालावधी कमी झाला आहे. सध्या हा कालावधी साधारण २० दिवसांवर आणण्यात आला आहे. आगामी काळात तो आणखी कमी करून १४ दिवसांपर्यंत आणण्याचे प्रशासनाचे उद्दिष्ट आहे.

अय्युब पठाण यांना साहित्य वाङ्मय पुरस्कार जाहीर



छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी) : मुंबई येथील मराठा मंदिर साहित्य शाखेच्या वतीने २०२६ चा मराठी वाङ्मय साहित्य पुरस्कार बालभारतीच्या पाठ्यपुस्तकातील कवी तथा लेखक श्री. अय्युब पठाण लोहगावकर यांना जाहीर झालेला आहे. श्री.अय्युब पठाण हे गेल्या ४० वर्षापासून मराठी साहित्य लेखनात विविध प्रकाराचे साहित्य लेखन करून सामाजिक कार्य करीत असून तसेच बालकांसाठी मनोरंजनातून प्रबोधनात्मक बाल लेखन कार्य करीत आहे. म्हणून त्यांच्या या मराठी साहित्य लेखनाची दखल घेऊन त्यांना मुंबई येथील साहित्य वाङ्मय या पुरस्कारासाठी त्यांची निवड केलेली आहे. आणि हा पुरस्कार २६ नोव्हेंबर गुरुवार २०२६ रोजी मुंबई येथे संविधान दिनाच्या शुभ मुहूर्तावर प्रसिद्ध इतिहासकार जयसिंगराव पवार आणि तसेच जेष्ठ पत्रकार तथा पद्मश्री कुमार केतकर यांच्या हस्ते स्मृतीचिन्ह, सन्मानपत्र, आणि रोख रक्कम देऊन अय्युब पठाण यांना साहित्य वाङ्मय पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे.

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार २३ नोव्हेंबर २०२६

ग्रामीण वास्तवाच्या काळोखातील माणुसकीचा 'कवडसा'

ग्रामीण जीवन म्हणजे केवळ हिरवीगार शेते, मातीचा सुगंध, गावगाडा आणि नात्यांची ऊब नसते; तर गावगाड्याच्या पोटात जातिव्यवस्थेचे विष, आर्थिक विषमता, स्त्रीजीवनाची घुसमट, शेतकऱ्यांच्या जगण्यातील अनिश्चितता आणि माणसांतील विषमतेचे अनेक अदृश्य पैलू असतात. अशाच काही अस्वस्थ करणाऱ्या पैलूंचा उलगडा डॉ. सत्यशीला उत्तमराव तौर-देशमुख यांनी 'कवडसा' या कथासंग्रहात केलेला आहे. पालवी प्रकाशनाने प्रकाशित केलेल्या या संग्रहात 'निरप्या', 'दिसं', 'गोषा', 'मया', 'दवंडी', 'सोयरीक', 'वलांडा' आणि 'कवडसा' अशा आठ कथांचा समावेश आहे. या कथा केवळ ग्रामीण माणसांच्या आयुष्याची केवळ वर्णने नसून त्यांच्या जगण्याला आकार देणाऱ्या सामाजिक परिस्थितीचा शोध घेणारे संवेदनशील लेखन आहे. लेखिकेच्या अनुभवविश्वाला सामाजिक जाणिवांची जोड लाभल्यामुळे या कथांतील पात्रे शब्दांच्या कुबड्या घेऊन कागदावर उभी राहिलेली काल्पनिक माणसे न वाटता भोवताली वावरणारी, सुख-दुःखांनी मंतरलेली माणसे वाटतात. अंधाराला ओळखून घेण्यासाठी कधी तरी प्रकाशाचा एखादा कवडसा पुरेसा असतो. या कथासंग्रहाचा केंद्रबिंदू ग्रामीण माणूस आहे. त्याच्या जगण्यातील संघर्ष, नातेसंबंधांतील गुंतागुंत, सामाजिक प्रतिष्ठेचे निकष आणि परिस्थितीशी झगडताना टिकून राहिलेली माणुसकी हे या कथांचे आशयसूत्र आहे. माणसांच्या जगण्यातल्या वेदना, संघर्ष, अस्वस्थता आणि माणुसकीच्या ओलाव्याचा असाच एक 'कवडसा' या कथासंग्रहातून वाचकांच्या मनात उतरतो. 'निरप्या' ही कथा या संग्रहातील महत्त्वाची कथा आहे. बबन या बालकाच्या अनुभवातून ग्रामीण समाजातील बालमजुरी, जातीय विषमता आणि शिक्षणापासून वंचित राहणाऱ्या मुलांचे वास्तव लेखिका या कथेत मांडतात. पाटलांच्या शेतावर काम करणाऱ्या बबनला शाळेत जाण्याची ओढ आहे; परंतु त्याच्या वाट्याला सामाजिक उपेक्षा आणि अपमान येतो. पाटलांच्या मुलाला मिळणाऱ्या शैक्षणिक संधी आणि बबनच्या वाट्याला आलेले श्रमाधारित बालपण यातील फरक सामाजिक विषमतेचे विदारक चित्र उभे करते. या कथेत बबन या बालमनाचे परिणामकारक चित्रण आहे. बबनच्या निरागसतेला सामाजिक व्यवस्थेने दिलेली जखम वाचकाला अंतर्मुख करते. मात्र कथेत बालशोषण आणि जातीय अन्यायाचे चित्रण अधिक प्रभावी असले तरी त्यामागील व्यवस्थात्मक कारणांचा सखोल ऊहापोह आणखी विस्ताराने झाला असता तर कथेची सामाजिक व्याप्ती अधिक व्यापक झाली असती. 'दिसं' ही कथा माणसाच्या जगण्यातील मृत्यू, कर्ज आणि कौटुंबिक जबाबदाऱ्यांच्या ओझ्यांचा वेध घेते. जवळच्या माणसाच्या मृत्यूनंतर उभे राहणारे प्रश्न, अंत्यसंस्काराच्या निमित्ताने पुढे येणारी आर्थिक विवंचना आणि जगण्याच्या व्यवहारातील अगतिकता या कथेतून व्यक्त होते. मृत्यू हा एका व्यक्तीचा शेवट असला तरी मागे राहिलेल्यांसाठी तो अनेक नव्या प्रश्नांची सुरुवात असतो. याची जाणीव ही कथा करून देते. दुःखाला शब्दांचा फारसा बडेजाव न देता प्रसंगांच्या माध्यमातून त्याची तीव्रता व्यक्त करणे हे या कथालेखनाचे वैशिष्ट्यच म्हणावे लागेल. 'गोषा' ही कथा स्त्रीजीवनातील आत्मसन्मान आणि सामाजिक प्रतिष्ठेच्या प्रश्नाला स्पर्श करते. मंजुळा आणि हौसा या दोन मैत्रिणींच्या नात्यातून स्त्रीमैत्रीची भावनिक ताकद लेखिका व्यक्त करतात. पाटलांच्या घरातील सामाजिक प्रतिष्ठा, स्त्रियांच्या जाण्या-येण्यावर असलेली बंधने आणि स्त्रीच्या इच्छेला दुय्यम स्थान देणारी मानसिकता या कथेतून स्पष्ट होते. विशेषतः हौसा आणि मंजुळा यांच्या जत्रेला जाण्याच्या प्रसंगातून त्यांच्या मैत्रीची आणि सामाजिक बंधनाशी संघर्ष करण्याच्या वृत्तीची जाणीव होते. पाटलीणबाईंच्या हस्तक्षेपातून परिस्थितीला मिळणारे वळण हे कथानकाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. स्त्रीच्या इच्छेला सामाजिक मान्यतेची गरज का भासते? हा प्रश्न ही कथा उपस्थित करते. 'मया' ही कथा स्त्रीमनातील गुंतागुंत आणि नात्यांमधील भावनिक संघर्ष अधोरेखित करते. गंगा आणि सुमन यांच्या नात्याभोवती निर्माण होणाऱ्या भावभावना, मत्सर, माया, कर्तव्य आणि असहायता यांचे चित्रण करताना लेखिका स्त्रीमनाचे अनेक पदर उलगडतात. माणसाच्या मनात प्रेम आणि राग, माया आणि मत्सर या परस्परविरोधी भावना एकाच वेळी नांदू शकतात. माणूस हा एका रंगाचा नसतो तर त्याच्या मनात अनेक रंगांचे आणि छटांचे जग असते याची जाणीव ही कथा करून देते. 'दवंडी' या कथेतून स्त्रीशिक्षणाचा प्रश्न अधिक ठळकपणे समोर येतो. ग्रामीण समाजातील स्त्रियांनी अक्षरओळख करून घ्यावी, त्यातून त्यांना स्वतःच्या हक्कांची जाणीव व्हावी आणि त्यांनी स्वाभिमानाने जगावे ही भूमिका लेखिका या कथेतून मांडतात. बायजाबाई आणि रुक्मिणीसारख्या स्त्रीपात्राच्या माध्यमातून शिक्षणामुळे स्त्रीच्या जगण्याला मिळणारी नवी दिशा अधोरेखित होते. विशेष म्हणजे शिक्षण हे केवळ अक्षरज्ञान नसून ते माणसाला स्वतःच्या अस्तित्वाची जाणीव करून देणारे साधन आहे, हा विचार प्रस्तुत कथेतून प्रत्ययास येतो. स्त्रीशिक्षणाची चर्चा केवळ भाषणात न राहता ती गावाच्या जगण्यात उतरली पाहिजे, अशी अंतःप्रेरणा या कथेतून प्रस्फुरित होते. 'सोयरीक' ही कथा मात्र सामाजिक प्रतिष्ठा, आर्थिक परिस्थिती आणि विवाहसंस्थेतील बदलत्या मूल्यव्यवस्थेचा वेध घेते. पाटील कुटुंब आणि देशमुख कुटुंब यांच्यातील विवाहसंबंधाच्या चर्चेतून मुलीच्या विवाहाबाबतचे सामाजिक संकेत, मानपान आणि नव्या पिढीच्या अपेक्षा यातून व्यक्त होतात. मुलीच्या शिक्षणाला आणि तिच्या भविष्याला महत्त्व देण्याचा विचार कथेतून पुढे येतो. विवाह म्हणजे दोन व्यक्तीचे नाते की दोन कुटुंबांच्या प्रतिष्ठेचा व्यवहार? हा प्रश्न कथा अप्रत्यक्षपणे उपस्थित करते. ग्रामीण समाजात विवाहाच्या निमित्ताने पुढे येणारे आर्थिक आणि सामाजिक निकष लेखिका कथानकातून उलगडतात. नातेसंबंधांमध्ये प्रतिष्ठेपेक्षा माणुसकी आणि समजूतदारपणाला महत्त्व मिळावे ही या कथेमागील लेखिकेची भूमिका अधोरेखित होते. 'वलांडा' ही कथा ग्रामीण समाजातील अंधश्रद्धा, स्त्रीचे शोषण, कौटुंबिक अवहेलना आणि माणसांच्या संशयी मानसिकतेचा वेध घेणारी कथा आहे. या कथेच्या केंद्रस्थानी धुरपता हे स्त्रीपात्र आहे. तिच्या आयुष्यातील घडामोडींच्या माध्यमातून लेखिका ग्रामीण समाजातील स्त्रीच्या अस्तित्वाची शोकांतिका मांडतात. अर्थात धुरपता ही केवळ अंधश्रद्धेची बळी ठरलेली स्त्री नाही; तर माणसांवर विश्वास ठेवण्याची शिक्षा आयुष्यभर भोगणारी एक असहाय स्त्री आहे. ही कथा स्त्रीच्या आयुष्याभोवती संशयाचे वळसे घालणाऱ्या ग्रामीण मानसिकतेचे वास्तवदर्शी चित्रण करते. स्त्रीच्या दुःखाला तिचे नशीब किंवा करणी-भानामतीचे कारण देण्यापेक्षा त्या दुःखामागील सामाजिक व्यवस्था तपासली पाहिजे, असा विचार ही कथा वाचकांच्या मनात निर्माण करते. 'कवडसा'मधील माधू आणि गौरीचे जगणे ग्रामीण कुटुंबाच्या असुरक्षिततेचे प्रतिनिधित्व करते. शेतीवर अवलंबून असलेल्या कुटुंबाचे भविष्य पावसाच्या अनिश्चिततेशी किती घट्ट बांधलेले असते? हे लेखिका माधूच्या आयुष्याच्या माध्यमातून दाखवतात. यातील माधूचे गौरीशी झालेले शेवटचे बोलणे तर अंतर्मुख करणारे आहे. स्वतःच्या जगण्याची खात्री नसतानाही पत्नीला नव्याने संसार करण्याचे आश्वासन देणाऱ्या माधूच्या शब्दांत प्रेम आहे, काळजी आहे आणि जगण्याच्या असुरक्षिततेची खोल जाणीवही आहे. येथे लेखिका शेतकरी आत्महत्येचा प्रश्न केवळ आकडेवारीतून मांडत नाहीत तर त्या प्रश्नामागे उभ्या असलेल्या एका माणसाचे आणि त्याच्या कुटुंबाचे भावविश्व वाचकांसमोर आणतात. प्रमाण मराठीबरोबरच ग्रामीण बोलीभाषेचा सहज आणि प्रभावी वापर हे या संग्रहाचे सर्वांत लक्षणीय वैशिष्ट्य आहे. त्यात 'म्या', 'काई', 'न्हाय', 'कवळ', 'गं', 'बघ'सारख्या बोलीप्रयोगातून पात्रांचे सामाजिक आणि भौगोलिक व्यक्तिमत्त्व आकाराला येते. पाटील, शेतकरी, स्त्रिया, लहान मुले आणि गावातील इतर व्यक्ती यांच्या बोलण्यातील वेगळेपण लेखिका प्रसंगीकपणे जपतात. शिवाय 'निरप्या'तील बबनचे बालसुलभ निवेदन आणि 'गोषा'तील हौसा-मंजुळाच्या संवादातून बोलीभाषेचे सामर्थ्य प्रत्ययास येते. ग्रामीण भाषेतील म्हणी, वाक्प्रचार आणि उपरोधिक संवाद या कथांना जिवंतपणा देतात. त्यामुळे वाचकाला या कथा वाचताना गावाच्या अवकाशात प्रवेश केल्याचा अनुभव येतो. कथासंग्रहाचे मूल्यमापन केवळ त्याच्या सकारात्मक बाजूंनी करून चालणार नाही. साहित्यकृतीचे खरे मूल्यमापन तिच्या गुणदोषांच्या समतोल विचारातूनच घडते. या दृष्टीने पाहता काही कथांमध्ये निवेदनाचा विस्तार जाणवतो. एखादा प्रसंग वाचकाच्या मनावर परिणाम करून गेल्यानंतरही त्याच भावनेचे स्पष्टीकरण संवादातून किंवा निवेदनातून पुन्हा-पुन्हा येते. त्यामुळे काही ठिकाणी कथनाचा वेग मंदावतो. काही प्रसंगांमध्ये भावनिकतेची तीव्रता अधिक असल्यामुळे सूचकतेला वाव कमी मिळतो. 'कवडसा'मधील माधूच्या मानसिक अवस्थेचे चित्रण प्रभावी असले तरी काही ठिकाणी अधिक संयत निवेदनातूनही तोच परिणाम साधता आला असता. तसेच काही कथांमध्ये सामाजिक प्रश्नांची गुंतागुंत अधिक खोलवर उलगडण्याची संधी होती. उदा. जातीय विषमता, स्त्रीशिक्षण किंवा शेतकरी जीवनातील संकटे यांची केवळ वैयक्तिक अनुभवापुरती मांडणी न राहता त्यामागील व्यापक सामाजिक आणि आर्थिक कारणांचा अधिक वेध घेतला असता तर कथांना आणखी वैचारिक खोली प्राप्त झाली असती. काही ठिकाणी समस्यांवरील उपाय तुलनेने समंजस आणि आदर्शवादी पद्धतीने समोर येतात. वास्तवातील संघर्ष अधिक गुंतागुंतीचा असतो, याची जाणीव कथानकात आणखी ठळक करता आली असती. ही निरीक्षणे संग्रहातील संवेदनशील आशय नाकारण्यासाठी नसून त्याच्या कलात्मक शक्यतांकडे लक्ष वेधणारी आहेत. या मर्यादा असूनही 'कवडसा'चे महत्त्व कमी होत नाही. कारण या संग्रहाच्या केंद्रस्थानी माणूस आहे. लेखिका आपल्या पात्रांकडे वरवरच्या सहानुभूतीने पाहत नाहीत तर त्यांच्या जगण्यातील वेदना समजून घेण्याचा प्रयत्न करतात. त्यांच्यातील दोषांपेक्षा त्यांना त्या अवस्थेपर्यंत आणणाऱ्या परिस्थितीचा शोध घेतात. म्हणूनच या कथांतील माणसे काळी-पांढरी नसून स्वभावातील विरोधाभासांसह जगणारी वाटतात. त्यांच्या जगण्यात राग, माया, संघर्ष, अगतिकता आहे आणि तरीही कुठेतरी माणुसकीचा ओलावा टिकून आहे. 'कवडसा' हे शीर्षकच प्रतीकात्मक आहे. अंधारलेल्या खोलीत छताच्या किंवा भिंतीच्या फटीतून येणारा प्रकाशाचा कवडसा जसा अंधाराचे अस्तित्व अधिक ठळक करतो तसाच या कथांमधील आशय ग्रामीण जीवनातील दुर्लक्षित वास्तवाकडे लक्ष वेधतो. या कथांमधून लेखिका ग्रामीण जीवनाचे सर्वंकष चित्रण उभे करण्याचा दावा करत नाहीत; परंतु त्या जीवनातील काही महत्त्वाच्या वेदनास्थळांवर प्रकाश टाकतात. लेखिकेची माणसांविषयीची सहानुभूती, पात्रांच्या चुका, मर्यादा आणि परिस्थिती यांचा विचार करताना लेखिका त्यांच्याकडे केवळ दोषांच्या नजरेने पाहत नाहीत. तर त्या त्यामागील सामाजिक परिस्थिती समजून घेण्याचा प्रयत्न करतात. असे काही या संग्रहातील कथांचा महत्त्वाचा गुण दिसून येतो. त्यामुळे या कथांना केवळ सामाजिक समस्यांचे दस्तऐवजीकरण न राहता मानवी संवेदनांचे अधिष्ठान प्राप्त होते. 'कवडसा' हा ग्रामीण जीवनातील अंधार, संघर्ष आणि माणुसकीच्या शोधाचा कथासंग्रह आहे. या संग्रहाचे महत्त्व त्यातील समस्यांची संख्या किंवा घटनांची नाट्यमयतेत नसून त्या समस्यांच्या पाठीशी उभ्या असलेल्या माणसांच्या जगण्यातील वेदना व्यक्त करण्यात आहे. काही कथांमध्ये कथनाच्या विस्तारावर नियंत्रण, पात्रांच्या अंतर्मनाचा अधिक सखोल शोध आणि सामाजिक प्रश्नांच्या व्यापक संदर्भांची मांडणी यांना अधिक वाव देता आला असता. तरीही ग्रामीण बोलीचे सामर्थ्य, स्त्रीजीवनाविषयीची संवेदनशीलता, वंचितांच्या जगण्याची जाणीव आणि शेतकरी जीवनातील वेदनेचे अस्सल चित्रण यामुळे हा संग्रह लक्षात राहतो. आज विकासाच्या गगनभेदी घोषणा होत असताना बबनसारख्या मुलांच्या हातात अजूनही शिक्षणाऐवजी श्रम येतात, बायजाबाईंसारख्या स्त्रियांना अक्षरओळखीसाठी संघर्ष करावा लागतो आणि माधूसारख्या शेतकऱ्यांना उद्याच्या दिवसाची खात्री नसते. अशा वास्तवात अंधाराला दोष देत बसण्यापेक्षा त्यात उजेडाची एखादी फट शोधणे अधिक महत्त्वाचे असते. डॉ. सत्यशीला तौर-देशमुख यांचा 'कवडसा' हाच उजेड शोधण्याचा प्रामाणिक प्रयत्न आहे. हा कवडसा कदाचित संपूर्ण अंधार दूर करणार नाही; पण अंधारात हरवलेल्या माणसांचे चेहरे नक्कीच वाचकाला दाखवेल अशी अपेक्षा.!

पुस्तक परिचय

- पुस्तक : कवडसा
- लेखिका : डॉ. सत्यशीला उत्तमराव तौर-देशमुख
- पालवी प्रकाशन, ठाणे. प्र.आ., 12 डिसेंबर 2025
- पृष्ठसंख्या : 96, किंमत : ₹180



- डॉ. वासुदेव ऊगले
विभागप्रमुख,
मराठी भाषा व वाङ्मय विभाग,
श्रीमती दानकुँवर महिला महाविद्यालय, जालना
vasnt.ugale@gmail.com